# भारतीय सुपरबाईकच्या बाजारपेठेत आता 'डीएसके बेनेली'

पुणे : डीएसके मोटोव्हील्स या भारतातील सुपरबाइकच्या उद्योगातील प्रस्थापित आणि शक्तिशाली कंपनीने आज आपल्या बेनेली या ख्यातनाम इटालियन मोटरसायकलिंग दिग्गज कंपनीशी भागिदारीची घोषणा केली आहे.

बेनेलीने आपले कार्य १९११ साली सुरु केले. त्यामुळे ती सर्वात जुनी इटालियन मोटरसायकल कंपनी ठरली आहे. या कंपनीचा रंगीत प्रवास १९११ साली 'बेनेली गराज'मध्ये सुरु झाला.

येथे सहा बेनेली बंधू जियुसेपे, जियोवान्नी, फ्रॅन्सेस्को, फिलिपो, डॉमेनिको आणि अॅन्टोनिओ (टोनिनो या



नावानेही ओळखला जातो) यांनी एकत्रितरित्या काम करुन मोटरसायकल्स दुरुस्ती आणि उत्पादन सुरु केले. बेनेलीला मोटरस्पोर्ट्सच्या अॅक्शनने भरलेल्या जगात कौतुक प्राप्त झाले. येथे इटालियन, युरोपियन आणि जागतिक रेसिंग चॅम्पियनशिप्समध्ये १९३९ सालापासून हजारो विजय प्राप्त करण्यात बेनेलीच्या बाइक्सनी एक महत्त्वाची भूमिका बजावली. या समृद्ध आणि शुद्ध वर्गातून निर्माण झालेल्या बेनेलीकडून आज सक्षम, जागतिक स्तरावर आदरप्राप्त सुपरबाइक्सची आकर्षक श्रेणी आणली जात आहे. त्यात वारसा, नावीन्यपूर्णता, स्टायलिंग आणि तांत्रिक शक्ती या सर्वांचा समावेश आहे. बेनेलीच्या अत्यंत वेगळ्या रितीने स्टाइल केलेल्या मोटरसायकल्स त्यांच्या इटालियन लूक्स आणि प्रत्येक क्षेत्रातील रायडर्सना एक शुद्ध व उच्च कामगिरीचा अनुभव देण्याची क्षमता यांच्यासाठी ओळखल्या जातात.

फ्रॅंक झुआन्ग, मंडळ संचालक, बेनेली क्यूजे एसआरएल या ऐतिहासिक कराराच्या घोषणेच्या वेळी उपस्थित होते.

ते म्हणाले की, ''इटली, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि स्पेन अशा सुमारे ३० देशांमध्ये आमचे अस्तित्त्व निर्माण केल्यानंतर आता आम्हाला जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या दुचाकींच्या बाजारपेठेत जगातील सर्वोत्तम डिझाइन केलेल्या आणि कामगिरीच्या सुपरबाइक्स आणताना आनंद होत आहे. भारतीय दुचाकी बाजारपेठ १०-१२ टक्के इतक्या आकारमानाने वाढत आहे आणि २०१५-१६ पर्यंत ती २१-२३ दशलक्ष एककांचा आकार गाठण्यासाठी सज्ज आहे.''

